| | | |
|---|---|---|
| कार्यालयाचे नांव | : | **उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,रत्नागिरी** |
| पत्ता | : | घर नं. ७२० क, श्रीमती के.बी.मुकादम यांचे घर, आरोग्यमंदिर,शिवाजीनगर, रत्नागिरी ४१५ ६३९. |
| कार्यालय प्रमुख | : | उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,रत्नागिरी. |
| शासकिय विभागाचे नांव | : | सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी. |
| कोणत्या मत्रालयीन खात्याच्या अधिनस्त स्थापना | : | ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई. सन १९८२ |
| कार्यक्षेत्र | : | भौगोलिक : मंडणगड/दापोली/खेड/चिपळूण/गुहागर/संगमेश्वर(देवरुख)/ रत्नागिरी/लांजा व राजापूर तालुके. |
| कार्यानुरुप | : | रत्नागिरी विभाग (जिल्हा) |
| विशिष्ट कार्ये | : | सर्वसामान्यांमध्ये वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, रोपार्मिती,पर्यावरण रक्षण, जलसंधारण, मृदसंधारण, पडिक जमिन विकास आदीं बाबींबाबत जाणीव निर्माण करणेसाठी प्रचार व प्रसिध्दीचे कार्य. |
| विभागाचे ध्येय / धोरण | : | जनतेंमध्ये वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, रोपार्मिती,पर्यावरण रक्षण, जलसंधारण, मृदसंधारण, पडिक जमिन विकास आदींबाबत जाणीव निर्माण करुन त्यासंबंधीचे जनजागृतीचे व त्यायोगे भूपृष्ठावरील वृक्षाच्छादन वाढविण्याचे काम करणे.<br>प्रामुख्याने खालील उददीष्टांसाठी सामाजिक वनीकरण यंत्रणेची निर्मिती करण्यात आली.<br>१) ग्रामीण भागात इधन, चारा, लहान इमारती लाकूड व फळे इ. दैनंदीन गरजांचा पुरवठा करणे .<br>२) ग्रामस्थांच्या खाजगी आणि सामुदायिक जमिनीवर निरंतर पुरवठा करता येईल असे वनोपज निर्माण करण्यासाठी ग्रामीणांना सहकार्य<br>३) निर्वनीकरणाचा वेग कमी करणे .<br>३) ग्रामीण भागात रोजगाराची निर्मिती करणे. |
| मालमत्तेचा तपशिल | : | विभागीय कार्यालयाची इमारत खाजगी मालकीची आहे तसेच ७ परीक्षेत्र कार्यालये खाजगी मालकीच्या जागेत भाडयाने आहेत. |
| उपलब्ध सेवा | : | सवलतीचे दराने रोपे विक्री प्रचार व प्रसिध्दी व प्रशिक्षण व जनतेला वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करणे. |
| कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक व वेळा ई मेल पत्ता | : | दूरध्वनी क्रमांक ०२३५२/२२२९६९ कामाच्या वेळा शासकीय सुटटीव्यतिरिक्त सकाळी १०.०० ते संध्याकाळी १७.४५ e mail ddsfrtg @gmail.com |
| साप्ताहिक सुटटी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा | : | साप्ताहिक सुटटी - रविवार तसेच दुसरा व चवथा शनिवार. सकाळी १०.०० ते सायंकाळी १७.४५ |
| तालुकास्तरावरील कार्यालयांचे पत्ते | : | १) लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कार्यालय खेड ( यामध्ये मंडणगड व दापोली तालुक्याचा समावेश आहे.) श्रीमती रचना पै यांचे घर, ॲडव्होकेट कोठारी यांचे समोर, शिवतर रोड, ता.खेड जिल्हा रत्नागिरी पिन कोड नंबर ४१५ ७०९<br>२) लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कार्यालय चिपळूण |

श्री. किसन लटके यांचे घर, झरी रोड, तहसिलदार कार्यालयाजवळ, ता. चिपळूण
जिल्हा रत्नागिरी पिन कोड नंबर ४१५ ६०५

३) लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कार्यालय गुहागर
श्री. एस.एस.साळवी यांचे घर, साळवी वाडी, पेट्रोल पंपाजवळ मु.पो.चिखली
ता. गुहागर जिल्हा रत्नागिरी पिन कोड नंबर ४१५ ७२४

४) लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कार्यालय देवरुख
श्री. जी.आर.करंडे यांचे घर, जैन मंदिरा समोर, मु.पो.देवरुख ता. संगमेश्वर
जिल्हा रत्नागिरी पिन कोड नंबर ४१५ ८०४

५) लागवड अधिकारी,सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कार्यालय रत्नागिरी
घर नं. ७२० क, श्रीमती के.बी.मुकादम यांचे घर, आरोग्यमंदिर,शिवाजीनगर,
रत्नागिरी पिन कोड नंबर ४१५ ६३९.

६) लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कार्यालय लांजा
श्रीमती एस.एस.सावंत यांचे घर, मातोश्री निवास, बसस्थानकाजवळ मु.पो.ता. लांजा
जिल्हा रत्नागिरी पिन कोड नंबर ४१६ ७०१

७) लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कार्यालय राजापूर
घर नंबर १५१६ब,श्रीमती रजनी राजेंद्र मयेकर यांचे घर, गुजर आळी ता. राजापूर
जिल्हा रत्नागिरी पिन कोड नंबर ४१६ ७०२

सस्थेच्या प्रारुप तक्ता

शासकिय विभागाचे नांव :- ग्रामविकास व जलसंधारण विभाग ,महाराष्ट्र शासान

▼

संचालक सामाजिक वनीकरण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे

▼

सहसंचालक कोकण सामाजिक वनीकरण वृत्त ठाणे

▼

उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग,रत्नागिरी

▼

सहाय्यक संचालक सामाजिक वनीकरण विभाग,रत्नागिरी

▼

मुख्यलेखापाल सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी

▼

| | | |
|---|---|---|
| ▼ | ▼ | ▼ |
| लेखापाल कक्ष | आस्थापना लिपीक कक्ष | योजना लिपीक कक्ष |
| ▼ | ▼ | ▼ |
| वेतनशाखा लिपीक कक्ष | सर्व्हेक्षक कक्ष | भांडार लिपीक कक्ष |
| ▼ | ▼ | ▼ |
| ए.प.ज.वि.का.लिपीक कक्ष | लघटंकुलेखक कक्ष | वाहनचालक |
| ▼ | | |
| शिपाई /पहारेकरी | | |

सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी या विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजना.

१) वनमहोत्सव रोपवाटीका

सामाजिक वनीकरण खात्यामार्फत राबविणेत येणा-या विविध योजनेअंतर्गतच्या लागवडीसाठी व जनतेला शाळा,विविध संस्था, शासकिय/निमशासकिय कार्यालये यांना शासकिय दराने रोपे उपलब्ध करुन देणेसाठी वनमहोत्सव रोपवाटिकेत विविध वृक्ष प्रजाती व शोभिवंत रोपांची सामाजिक वनीकरण रत्नागिरी विभागामार्फत संबंधित तालुक्याचे परिक्षेत्र कार्यालयाकडून निर्मिती केली जाते. रोपे विक्रीचा दर शासनाकडून दरवर्षी मंजूर करण्यात येतो. रोपे विक्रीपासून प्राप्त झालेला महसूल शासन तिजोरीत भरणा करणेत येतो.

## २) मध्यवर्ती रोपवाटिका-

सामाजिक वनीकरण खात्यामार्फत राबविणेत येणा-या विविध योजनेअंतर्गतच्या लागवडीसाठी व जनतेला शाळा,विविध संस्था, शासकिय/निमशासकिय कार्यालये यांना शासकिय दराने रोपे उपलब्ध करुन देणेसाठी मध्यवर्ती रोपवाटिकेत विविध वृक्ष प्रजाती व शोभिवंत रोपांची सामाजिक वनीकरण रत्नागिरी विभागामार्फत संबंधित तालुक्याचे परिक्षेत्र कार्यालयाकडून निर्मिती केली जाते. रोपे विक्रीचा दर शासनाकडून दरवर्षी मंजूर करण्यात येतो. रोपे विक्रीपासून प्राप्त झालेला महसूल शासन तिजोरीत भरणा करणेत येतो.

## ३) किसान रोपवाटिका योजना-

ही योजना राज्यात सन १९८६-८७ पासून केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्यातून राबविणेत आली. सन १९९२-९३ पासून ही योजना राज्य शासनाकडे हस्तांतरीत करणेत आली.या योजनेमध्ये कांही बदल करुन सुधारीत किसान रोपवाटिका योजना सन १९९३-९४ पासून राज्य शासनाच्या निधीमधून राबविण्यांत येत आहे.

<u>या योजनेची उद्दीष्टै पुढीलप्रमाणे आहेत.</u>

१. रोपनिर्मितीचे तंत्रज्ञान जनतेपर्यंत पोहोचविणे.
२. अनुभवी लाभार्थीना खाजगी रोपवाटिकेचा पूरक व्यवसाय उपलब्ध करु न देवून ,त्याव्दारे त्यांची आर्थिक पातळी उंचावण्यास मदत करणे.
३. शासकीय/निमशासकिय विभागासाठी रोपे उपलब्ध करुन देणे.
४. वृक्ष लागवडीसाठी स्थानिक पातळीवर रोपे उपलब्ध करुन देणे.
५. रोपेनिर्मिती व वृक्ष लागवडीचे कामामध्ये जनतेचा जास्तीत जास्त सहभाग मिळविणे.

या योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड संबंधित जिल्हयाचे उपसंचालक, सामाजिक वनीकरण यांचेकडून संबंधित तालुक्याचे लागवड अधिकारी यांचेमार्फत प्रामुख्याने लहान व सिमांतिक शेतक-यामधून करण्यात येते. या लहान व सिमांतिक शेतक-याकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्यास इतर शेतक-यास या योजनेचा लाभ देण्यात येतो. महिला मंडळे, अशासकिय संस्था, अपंगासाठी काम करणा-या संस्था इत्यादिची सुध्दा लाभधारक म्हणून निवड करण्यात येते.

<u>रोपनिर्मितीसाठी विभागाकडून पुढीलप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाते.</u>

| | | |
|---|---|---|
| <u>अ.</u> साहित्य रुपाने | (अग्रीम ) | |
| १० से.मी.x २० सेमी आकाराच्या पॉलीथीन पिशवीच्या किंमतीपोटी. | | २० पैसे /प्रती रोप. |
| बी-बियाणे रासायनिक खते व किटकनाशके यावरील खर्चापोटी. | | १७ पैसे/प्रती रोप. |
| ब. रोख रक्कमेच्या स्वरुपात मजुरीसाठी अग्रीम | | ५८ पैसे/प्रती रोप. |

एकूण ९५ पैसे/प्रती रोप.

यापैकी लाभधारकाने करारनामा केल्यावर ३७ पैसे प्रतिरोप अग्रीम हा पॉलिथीन पिशव्या, बी-बियाणे, खते व किटकनाशकांचे स्वरुपात दिला जातो. व त्यानंतर बी पेरणीचे काम पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर मजुरीपोटी अग्रीम ५८ पैसे प्रतिरोप रोखीच्या स्वरुपात दिला जातो. लाभार्थी क्डे स्वतःची किमान २ गुंठे जमिन हवी . जमिन निवासस्थानापासून जवळ असावी. बारमाही वाहतूक व्यवस्था उपलब्ध असावी. पाणी पुरवठयाची पुरेशी सोय असावी. लाभार्थीने तयार केलेल्या रोपांपैकी ५० टक्के रोपे २.८४ रुपया प्रतिरोप या दराने सामाजिक वनीकरण विभागाकडून फेरविकत घेतली जातात. उर्वरीत ५० टक्के रोपांची विक्री लाभार्थी त्यांचे मर्जीनुसार हव्या त्या दराने करु शकतो.

## ४) एकात्मिक पडिक जमिन विकास प्रकल्प

केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने आणि मार्गदर्शक सुचनांनुसार एकात्मिक पडीक जमिन विकास प्रकल्पांतर्गत या जिल्हयातील लांजा तालुक्यतील मौजे प्रभानवल्ली,वेरवली खुर्द, वेरवली बुद्रुक,आसगे,बेणी खूर्द,वाडगांव,हसोळ व कोर्ले् या ८ गावांत या विभागामार्फत व मौजे कुरंग, हर्दखळे,रिंगणे,कोंडगे या ४ गावात कृषि विभागामार्फत हा प्रकल्प राबविण्यांत येत आहे. सदर प्रकल्पांना केंद्र शासनाने

मंजुरी प्रदान केलेली आहे. प्रकल्पांतील तरतुंदीनुसार आणि केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार वरील प्रकल्पाच्या अंमल बजावणी करीता प्रत्येक प्रकल्पात २ प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. त्यांना प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे.

१. प्रकल्पाची प्रमुख वैशिष्टे:-

अ. पाणवहाळ क्षेत्रातील जमिन,पाणी,वृक्ष संपत्ती इत्यादी नैसर्गिक साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर करून पर्यावरणाचा -हास थांबविणे.

ब. पाणलोट क्षेत्रामध्ये स्थानिक तथा आधुनिक तंत्रज्ञान यांचा योग्य मेळ घालुन सुलभ कार्यपध्दती अवलंबुन गावाची सर्वांगीण विकासाची कामे करणे.

क. पाणलोट क्षेत्रातील रहीवाश्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावणे.

ड. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि गरजुंना आर्थिक मदत पुरवुन रोजगाराची साधने विकसित करणे.

इ. सामुहिक जबाबदारी व कृती याबाबत जनतेमध्ये जागृती व प्रशिक्षण करून त्यांचा आत्मविश्वास निर्माण करणे.

१. प्रकल्पांतर्गत करावयाचे कामांचे स्वरूप:-

अ. फलोत्पादन.

ब. सामुहीक व शासकीय मालकीच्या क्षेत्रावर वनीकरण व अनुषंगीक कामे.

क. जल व मृद संधारणाची कामे. उदा. सी.सी.टी.( सलग सम पातळी चर ), नालाबांध, चेकडॅम, गॅबीयनस्ट्रक्चर,लहान बंधारे, शेततळी, इत्यादी

ड. गावामधील छोटे उद्योगधंदे करणा-या लोकांचे गट स्थापुन त्यांचा प्रशिक्षण आर्थिक मदतीमधुन विकास करणे.

इ. समाजाला उपयोगी असणा-या पुर्वीच्या सामुहीक मालमत्तेची दुरूस्ती व सुधारणा करणे.

५) हरियाली प्रकल्प

हरियाली अंतर्गत एकात्मिक पडिक जमिन विकास कार्यक्रम हा चिपळूण तालुक्यामधील पाणवहाळ क्रमांक WF - ६१ मध्ये केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अनुदानामधून राबविण्यात येत आहे. सदरील प्रकल्पांतर्गत ५००० हेक्टर क्षेत्रात राबविण्या येत असून प्रति हेक्टरी रुपये ६०००/- याप्रमाणे एकूण रक्कम रुपये ३.०० कोटी मंजूर करण्यात आलेली आहे. या प्रकल्पांतर्गत चिपळूण तालुक्यातील पुढील ६ गांवे (तिवडी / रिक्टोली / कादवड / अडरे / धामणवणे / टेरव ) निवडण्यात आलेली आहेत. शासन निर्णय क्रमांक अप्रक्षे -१००३/प्र.क्र.१२०/जल-२० मुंबई दिनांक ०१.११.२००३ अन्वये व हरियाली मार्गदर्शक सूचनांचे अनुषंगाने ग्राम विकास समिती व तालुका पाणलोट विकास पथकाची स्थापना सहाही गावात स्थापन झालेल्या आहेत.सदरील गावांचे आराखडे तयार करण्यात आलेले असून त्याप्रमाणे कामांना सुरुवात झालेली आहे.

## जिल्हास्तरीय योजना:-

१. खाजगी पडिक जमिनीवर रोजगार हमी योजनेशी निगडीत वृक्ष लागवड व वैरण विकास योजना

शासन निर्णय क्रमांक एसएलएफ १८/०६/प्र.क्र.८२/जल-१२ दिनांक १३ जुलै २००६ अन्वये या योजनेला मंजूरी प्राप्त होऊन या विभागात ही योजना कार्यरत झाली.

योजनेची उददीष्ट -

१) राज्यातील पडिक व अनुत्पादित, विशेषत: अवर्षण व प्रवण क्षेत्रातील जमिनी उत्पादनक्षम बनविणे.

२) पडिक जमिन सुधारणा करण्याकरीतां योग्य ती गुंतवणूक करुन अशा जमिनीपासून मिळणा-या उत्पन्नात वृध्दी करणे.

३) ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना दीर्घकालीन उपजिवीकेचे साधन उपलब्ध करुन देणे.

४) वनेतर क्षेत्रामध्ये झाडोरा वाढविणे तसेच इंधन व चा-याची समस्या दूर करणे.

गांव / क्षेत्र / लाभधारक निवडीचे निकष

गाव निवडीचे निकष

ज्या गावात कमीत कमी एकंदर १० हेक्टर क्षेत्रासाठी इच्छूक लाभार्थी असतील अशी गावे या योजनेसाठी निवडायची असून गाव निवडीचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

१) पाणलोट विकासाची कामे झालेली आहेत, अशी गांवे.

२) खाजगी पडिक जमिनीची टक्केवारी जास्त आहे, अशी गांवे.

३) सिंचनाखाली येणा-या क्षेत्राची टक्केवारी कमी आहे, अशी गांवे.

४) वनक्षेत्राची टक्केवारी कमी आहे, अशी गांवे.

५) अल्प पर्जन्यमान असलेली गांवे.

क्षेत्र निवडीचे निकष व मर्यादा

१) या योजनेंतर्गत प्रति वैयक्तिक लाभधारक किंवा प्रति लाभधारक संस्था कमाल १० हेक्टर क्षेत्र.
२) कृषि वानिकी व वैरण विकास रोपवन नमुन्यासाठी किमान मर्यादा ०.४ हेक्टर.
३) जट्रोफा लागवडीसाठी ११११ रोपे म्हणजे एक हेक्टर अशी क्षेत्राची परीगणना करण्यात येईल.
४) जट्रोफा वगळून पटटा स्वरुपात १००० रोपे लागवडीस एक हेक्टर असे मानीवरित्या समजण्यात येईल.

लाभधारक निवडीचे निकष

१) ज्या शेतक-यांच्या नावावर जमीन आहे असे शेतकरी.
२) जमिन कुळ कायदयाखाली येत असल्यास व ७/१२ च्या उता-यावर कुळाचे नांव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबविता येईल.
३) स्वतःच्या मालकीची जमिन असणा-या, ना नफा ना तोटा तत्वावरील, संस्था नोंदणी अधिनियम १८६० खाली अथवा सार्वजनिक विश्वस्त नियम १९५० अन्वये नोंदणीकृत संस्था.

लाभधारक निवडीची पध्दत

१) लाभधारकांनी अर्ज संबंधित तालुक्याचे लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण यांचेकडून प्राप्त करुन भरुन सादर करावेत.
२) लाभधारकांची निवड ग्राम पंचायतीमार्फत ग्राम सभेमध्ये करण्यात येईल.
३) कोणत्या लाभधारकास किती लाभ घेता येईल याबाबतची माहिती ग्राम पंचायत संबंधित सहाय्यक लागवड अधिकारी यांना देईल.

लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्तीच्या स्थितीमध्ये लाभधारक निवडीचा प्राधान्यक्रम

१) महिला लाभधारक
२) अनुसूचित जमाती
३) अनुसूचित जाती
४) अत्यल्प भूधारक
५) अल्प भूधारक
६) इतर वर्गातील वैयक्तिक लाभधारक
७) संस्था

अंदाजपत्रक

१) अंदाजपत्रक तयार करणे - संबंधित तालुक्याचे लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परीक्षेत्र
२) तांत्रिक मान्यता - उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग,रत्नागिरी
३) प्रशासकीय मान्यता - जिल्हाधिकारी, रत्नागिरी.

लागवडीचे नमुने

खाजगी पडिक क्षेत्राच्या दर्जानुसार वृक्ष प्रजातींची निवड करण्यात येईल. संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी खालील नमुने व दर हेक्टरी एकूण रक्कम दिलेली आहे.

| अ.क्र. | प्रजाती | रोपे संख्या प्रति हेक्टर | लागवड पध्दत | * संपूर्ण अर्थसहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | साग ( पिशव्यातील ) | २५०० | ३० x ३० x ३० सेमी.आकाराचे खडडे | रु. ५५८९०/- |
| २ | साग ( जडीद्वारे ) | २५०० | क्रो बार पध्दतीने | रु. ४६०९०/- |
| ३ | ॲकेशिया मॅन्जीयम | ११११ | ४५ x ४५ x ४५ सेमी.आकाराचे खडडे | रु. ३४१००/- |
| ४ | मिश्र (निलगिरी/सुरु/शिवण) | २५०० | ३० x ३० x ३० सेमी.आकाराचे खडडे | रु. ६८९५०/- |
| ५ | अखादय तेलबिया प्रजाती | ११११ | ४५ x ४५ x ४५ सेमी.आकाराचे खडडे | रु. ३४२९०/- |
| ६ | शेत बांधावरील लागवड | १०० प्रति घटक | ४५ x ४५ x ४५ सेमी.आकाराचे खडडे | रु. ३६८०/- |
| ७ | कृषि वानिकी (सुबाभूळ/अंजन/आवळा) | २५० | ६० x ३० सेमी. आकाराचे ५०० र.मी.चर | रु. ११७८०/- |
| ८ | वैरण विकास | २०० | क्षेत्र नांगरटी व गवत बी पेरणी वैरण / चारा देणारी वृक्ष लागवड | रु. १७३७०/- |
| ९ | बांबू लागवड | ४०० | ४५ x ४५ x ४५ सेमी.आकाराचे खडडे | रु. २६९१०/- |
| १० | जट्रोफा लागवड | ११११ | ६० x ६० x ६० सेमी.आकाराचे खडडे | रु. २४७८९/- |

- टीप - सदरील दर हे रुपये ६८/- प्रति मन्युष्य दिवस या प्रमाणे आहेत.

अर्थसहाय्य वाटप

अर्थ सहाय्याची देय्य रक्कम प्रत्यक्ष कामानुसार तीन वर्षापर्यंत सहा हप्त्यांत धनादेशाद्वारे देण्यात येईल.

अर्थसहाय्यक वाटपाचे निकष

| हप्ता क्रमांक | निकष | कमाल रक्कम मर्यादेच्या १०० टक्के अनुदानासाठी पात्रता | कमाल रक्कम मर्यादेच्या ७५ टक्के अनुदानासाठी पात्रता | कमाल रक्कम मर्यादेच्या ५० टक्के अनुदानासाठी पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ ला | पूर्व तयारीची कामे | कामे पूर्ण झाल्यावर | .. | .. |
| २ रा | जिवंत रोपे | ७५% व त्यापेक्षा जास्त | ६५% पेक्षा जास्त व ७५% पेक्षा कमी | ५०% पेक्षा जास्त व ६५% पेक्षा कमी |
| ३ रा | जिवंत रोपे | ६०% व त्यापेक्षा जास्त | ५०% पेक्षा जास्त व ६०% पेक्षा कमी | ४५% पेक्षा जास्त व ५०% पेक्षा कमी |
| ४ था | जिवंत रोपे | ७०% व त्यापेक्षा जास्त | ६०% पेक्षा जास्त व ७०% पेक्षा कमी | ५०% पेक्षा जास्त व ६०% पेक्षा कमी |
| ५ वा | जिवंत रोपे | ६०% व त्यापेक्षा जास्त | ५०% पेक्षा जास्त व ६०% पेक्षा कमी | ४०% पेक्षा जास्त व ५०% पेक्षा कमी |
| ६ वा | जिवंत रोपे | ५०% व त्यापेक्षा जास्त | ४०% पेक्षा जास्त व ५०% पेक्षा कमी | ३५% पेक्षा जास्त व ४०% पेक्षा कमी |

या योजना अंतर्गत प्राप्त निधीतून सामुहिक क्षेत्रामध्ये वृक्ष लागवड रस्त्याचे व कालव्याचे दुतर्फा वृक्ष लागवडीची कामे केली जातात. उपसंचालक हे अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देवून प्रशासकिय मान्यता मा. जिल्हाधिकारी हे देतात.

२) राष्ट्रीय हरित सेना योजना

शालेय विदयार्थ्यांमार्फत पर्यावरण विषयक जागृती निर्माण करण्याच्या उददेशान केंद्र शासनाने सन २००१-०२ मध्येय देशातील शाळांमध्ये राष्ट्रीय हरित सेना या योजनेंतर्गत इको क्लब स्थापन करण्यासंबंधीचा कार्यक्रम तयार केला. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातही सन २००१-०२ पासून सदर योजना कार्यान्वित करण्यात आली. या योजनेची जबाबदारी सन २००६-०७ पासून केंद्रस्थ अधिकारी म्हणून संचालक, सामाजिक वनीकरण यांचेवर आली आहे व जिल्हा स्तरावर ही जबाबदारी उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग,रत्नागिरी यांचेवर आली आहे. या योजनेखाली या जिल्हयातील ९ तालुक्यातील एकूण २४८ शाळांमधून राष्ट्रीय हरित सेने अंतर्गत इको क्लबची स्थापना करण्यात आलेली असून त्यामार्फत सामाजिक वनीकरण विभागाशी संबंधित विविध कार्यक्रम संबंधित विदयांर्थ्यांमार्फत राबविण्यात येतात. तालुकावार इको क्लबची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुका | इको क्लबची संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मंडणगड | १५ |
| २ | दापोली | २८ |
| ३ | खेड | ३३ |
| ४ | चिपळूण | ४३ |
| ५ | गुहागर | १७ |
| ६ | संगमेश्वर (देवरुख) | २४ |
| ७ | रत्नागिरी | ३९ |
| ८ | लांजा | १७ |
| ९ | राजापूर | ३२ |
| | एकूण.. | २४८ |

याशिवाय आणखी नवीन ५० इको क्लब स्थापन करण्याचे उददीष्ट प्राप्त झालेले असून त्यादृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

## केंद्र स्तरीय योजना

पश्चिम घाट विकास कार्यक्रमः

या जिल्हयामध्ये निवडलेल्या पाणवहाळ क्षेत्रातील जिल्हयातील खेड/चिपळूण/संगमेश्वर/लांजा व राजापूर या ५ तालुक्यातील खाजगी जमिनीवर पथदर्शक लागवड व शेतीच्या बांधावर वृक्ष लागवड या योजना सुरु आहेत. पथदर्शक वृक्ष लागवड योजना राबविण्याची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. पश्चिम घाट क्षेत्रातील नैसर्गिक वैशिष्टे जतन करुन पर्यावरण परिस्थितीत समतोल राखणे.

२. या क्षेत्रातील अनुषंगिक विविधता जतन करणे.

३. मानवी कृतीमुळे पर्यावरण परिस्थितीस पाहोचलेली हानी दूर करुन पर्यावरण पुर्ववत करणे.

४. पर्यावरणा हातीमुळे होणा-या संभाव्य परिणामांची लोकांना जाणीव करुन देणे आणि त्याबाबत त्यांना शिक्षण देणे, पर्यावरण विषयक कार्यक्रमान्वये त्यांचा सहभाग मिळविणे. या योजने अंतर्गत शेताच्या बांधावर साग, बांबू, शिवण, खैर, बाभूळ, शेवगा, हादगा, काजू, निम, सिताफळ आणि जांभूळ या प्रजातींची लागवड करण्यांत येते. ६०० रोपे लागवडीकरिता एक मानीव हेक्टर धरण्यांत येतो.

१. प्रशिक्षण कार्यक्रम

सामाजिक वनीकरण विभागातील कर्मचारी व नागरिकांना प्रशिक्षण देऊन जनजागृती घडविण्याच्या दृष्टीकोनातून सन १९९२-९३ या वर्षापासून या विभागामार्फत अधिकारी/कर्मचारी ,स्वयंसेवी संस्था आणि जनतेला प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामागे लोकसहभागातून सामाजिक वनीकरणाचे कार्यक्रम राबविण्याकरीता जनतेला उदयुक्त करणे हा मुख्य हेतू आहे. सामाजिक वनीकरणाच्या विविध योजना लोकांपर्यत पोहोचाव्यात. या योजना राबविण्यासाठी समाजात प्रभावीपणे कार्य करु शकणा-या घटकांना याबाबत माहिती व्हावी व लाभार्थीना योजना राबविण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान उपलब्ध करुन दयावे या हेतूने प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी करण्यात आलेली आहे. लोकप्रतिनिधी,स्वयंसेवी संस्था, पुरस्कार विजेते यांचा सामाजिक वनीकरणाच्या योजना जनतेपर्यत पोहचविण्यास विशेष उपयोग होतो. या दृष्टीने अशा व्यक्तींचे तालुका, वृत्त व राज्यस्तरावर कार्यशाळा, प्रशिक्षण शिबीरे इत्यादीद्वारे प्रबोधन करण्यात येते. तसेच किसान रोपवाटीका व वनीकरण योजनांचे वैयक्तिक लाभार्थीना,योजना जेथे चांगल्या प्रकारे राबविण्यात आली आहे अशा ठिकाणी एकत्र करुन त्यांना योजना राबविण्यास प्रोत्साहीत करण्यात येते व योजनेचे तंत्र समजावून देण्यात येते.

दरवर्षी शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना रोपवाटीका तंत्र,जुने रोपवन व्यवस्थापन,प्रचार व प्रसिध्दी, रेनवॉटर हार्वेस्टिंग,न्यायालयीन प्रकरणे, सामुहिक सुसज्जता,औषधी वनस्पती.बांबू लागवड आदी विषयाची प्रशिक्षणे/ उजळणी प्रशिक्षणे दिली जातात.

२. प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम

सामाजिक वनीकरण विभागामार्फत वृक्षलागवड, मृद व जलसंवर्धनाच्या जनहिताच्या अनेक योजना राबविल्या जातात. या योजना लोकांचे सहकार्य घेंऊन ,त्यांना योजना राबविण्यासाठी प्रवृत्त करुन लोकसहभागाने राबविल्या जातात.सामाजिक वनीकरणाच्या यो विविध योजनांची माहिती जनतेस देऊन लोकांना योजनांमध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त करण्याचे , वृक्षलागवड व वृक्ष संवर्धन याबाबत विविध माध्यमाद्वारे जनजागृती करुन लोकांचे त्यासाठी पूर्ण सहकार्य मिळविण्याचे उद्देशाने विविध माध्यमाद्वारे प्रचार व प्रसिध्दीचे काम केले जाते. या कार्यक्रमाअंतर्गत करण्यात येणा-या कामांचा थोडक्यात तपशिल पुढील प्रमाणे आहे.

अ) विद्यालयीन माध्यमाद्वारे प्रसिध्दी

१. जिल्हास्तरावर निंबध,चित्रकला व वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन करणे.

महाविद्यालयीन स्पर्धासाठी ( इ.११वी व पुढे ) विद्यालयीन साठी ( इ.८ वी ते १० वी ) व प्राथमिक विद्यालयीनसाठी ( इ.४ थी ते ७ वी) असे तीन गट असून प्रत्येक स्तरावर स्पर्धा आयोजित करुन विद्यार्थ्यामध्ये वृक्ष संवर्धन, पर्यावरण संतुलन, मृद व जलसंधारण या विषयाबाबत जागृती केली जाते. विद्यालयीन व महाविद्यालयीन गटासाठी निबंध, चित्रकला व वक्तृत्व या स्पर्धा तर प्राथमिक विद्यालयीन गटासाठी फक्त चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येते.

ब) बहिशाल प्रसिध्दी

१. ग्रामसभांचे आयोजन

२. जिल्हास्तरावर वृक्षदिंडी कार्यक्रमांचे आयोजन

क) मुद्रण माध्यमाद्वारे प्रसिध्दी

१. घडिपत्रिका,स्टिकर्स, भित्तिपत्रिका यांचे वितरण

ड) इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे प्रसिध्दी

१. ध्वनीचित्रफितींची निर्मिती व प्रसारण

२. आकाशवाणी,दुरदर्शन इत्यादी वरुन जाहिरातीचे प्रसारण

३. आकाशवाणी व दूरदर्शन वेळोवेळी तज्ञांच्या भाषणांचे / मुलाखतीचे प्रसारण.

याशिवाय सामाजिक वनीकरणाचे क्षेत्रात वैशिष्ठपूर्ण काम करणा-या व्यक्ती व संस्था यांना महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार व केंद्र शासनातर्फे इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कार दिला जातो.

३. वनश्री पुरस्कार

सामाजिक वनीकरण हा आज एक आवश्यक आणि उपयुक्त उपक्रम झालेला आहे. सामाजिक वनीकरणाच्या प्रयत्नांना अधिक गती मिळावी, त्यात जनतेचा उस्फुर्त सहभाग वाढावा आणि ती एक लोकांची चळवळ व्हावी यासाठी वनीकरणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणा-या व्यक्ती व संस्थांना केंद्र शासनातर्फे इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र हा राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येत असते. याच धर्तीवर राज्य पातळीवर सुध्दा वनीकरणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या व्यक्ती व संस्थांना महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. सामान्य जनतेमध्ये वृक्षरोपण आणि वृक्षसंवर्धन याबाबत आस्था निर्माण व्हावी आणि चांगल्या कार्याचा गौरव व्हावा, हा त्यामागील उद्देश आहे.

अ) पुरस्काराचे स्वरुप

व्यक्ती,ग्रामपंचायत,शैक्षणिक संस्था,सेवाभावी संस्था व गट / विभाग / जिल्हा या पाच संवर्गात वनश्री पुरस्कार देण्यात येतो. गट/विभाग/जिल्हा या संवर्गामध्ये सरकारी / निमसरकारी कार्यालयांचा समावेश होतो. प्रत्येक संवर्गासाठी प्रथम,द्वितीय व तृतीय अशी तीन परितोषिके दिली जातात. प्रथम पुरस्कार रु.२५,०००/-चा असून द्वितीय व तृतीय पुरस्कार अनुक्रमे रुपये १५,०००/- व रुपये १०,०००/- चे आहेत. पुरस्काराची रक्कम राष्ट्रीय बचतपत्राच्या स्वरुपात दिली जाते. शिवाय प्रत्येक विजेत्याला मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येते. तसेच पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्था यांना पुरस्कार स्विकारण्यासाठी येण्या-जाण्याच्या खर्चासाठी रुपये ५००/- देण्यात येतात.

ब) पुरस्कारासाठी निवडीचे निकष

ज्या व्यक्ती आणि संस्था कमीत कमी तीन वर्षे वृक्षरोपण आणि वृक्षसंवर्धन क्षेत्रात कार्य करीत असतील त्यांनाच या पुरस्कारासाठी योग्य मानण्यात येते. राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर सामाजिक वनीकरणाच्या क्षेत्रात पुरस्कार प्राप्त केलेली व्यक्ती किंवा संस्था या पुरस्कारासाठी अपात्र समजण्यात येतात. शासकीय, निमशासकीय अधिकारी / कर्मचारी यांना या योजनेत सहभाग घेता येत नाही.

क) पुरस्कारासाठी अर्ज

दरवर्षी साधारणपणे १६ जानेवारीपर्यंत सामाजिक वनीकरण विभागातर्फे पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविले जातात. वनश्री पुरस्कारासाठी अर्ज विहित प्रपत्रात करावयाचा असतो. प्रपत्राचा नमुना सामाजिक वनीकरण कार्यालयातून प्राप्त होतो. व्यक्ती किंवा संस्थेच्या कार्याची माहिती देताना मागच्या तीन वर्षात त्यांनी स्वता:च्या आणि इतराच्या पडीत जमिनीवर किती वृक्षलागवड केली,जिवंत झाडाची टक्केवारी ,रोपवाटीका केली असेल तर किती रोपे तयार केली, वनीकरणाचे माध्यमातून शाळकरी विद्यार्थी तथा महिला यांच्या कल्याणार्थ केलेले कार्य, समाजातील दुर्बल घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी केलेले कार्य सामुहिक लागवडीचे कुंपणाविना ,स्वयंस्फुर्तीने संरक्षण व देखरेखीचे केलेले काम, वनीकरणाच्या संदर्भात जनजागृती व प्रसिध्दी/ प्रेरणा याबाबत केलेले कार्य यासंबधी सविस्तर माहिती/ आकडेवारी देणे आवश्यक आहे.

प्रस्तावासोबत व्यक्ती व संस्थेने केलेल्या वनीकरणांची छायाचित्रे,मान्यवरांची प्रशस्तीपत्रके, त्यांच्या कामाविषयीची काही प्रकाशने,प्रसिध्दी झाली असल्यास त्यांच्य प्रती, अशा कामासाठी पुर्वी काही पारितोषिके, पुरस्कार मिळाले असल्यास त्यांच्या प्रती जोडाव्यात.

ड) अर्ज सादर करण्याची मुदत

प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबर अखेरपर्यतच्या कार्याच्या आधारे १६ जानेवारी पर्यत विहित प्रपत्रात प्रस्ताव संबंधित जिल्हयाचे उपसंचालक,सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडे सादर करावा लागतो.

महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कारासाठी माहिती पत्रांचा नमुना

१. नोंदणी क्रमांक
२. नांव व पूर्ण पत्ता
३. असल्यास दुरध्वनी क्रमांक
   खालील बाबतीत व्यक्ती/संस्था यांनी केलेल्या कार्याचा तपशिल
४. लोकांमार्फत सामाजिक वनीकरणाच्या कामासाठी रोपवाटीका स्थापन करणे /जनतेला उदयुक्त करणे.
५. शासकीय/सामुहिक अथवा खाजगी जमीनीवर सरपण/वैरण देणा-या झाडांची लागवड
६. वृक्षलागवडीच्या कार्यक्रमात ग्रामीण दुर्बल घटकांचा तसेच महिलांचा सहभाग व त्यायोगे ग्रामीण अर्थच्यवस्थेमध्ये सुधार
७. वनीकरणांचे माध्यमातून शाळकरी विद्यार्थी तथा महिला यांचे कल्याणार्थ केलेले कार्य
८. सामुहिक लागवडीचे कुंपणाविना स्वयंस्फुर्तीने संरक्षण व देखभाल
९. अपारंपारिक उर्जा स्त्रोताचा वापर करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित करणे व त्याच्या वापरासाठी प्रवृत्त करण्याचे केलेले कार्य
१०. वनीकरणाच्या संबंधात जनजागृती/प्रसिध्दी व प्रेरणा याबाबतचे कार्य
११. केलेल्या कार्याचा कालावधी व  लागवडीविषयी जिवंत झाडांच्या टक्केवारीसह सद्यस्थिती
१२. केलेल्या कार्याविषयी काही प्रकाशने /प्रसिध्दी झाली असल्यास त्याच्या प्रती
१३. या अथवा अशा कामासाठी पूर्वी काही पारितोषिके,पुरस्कार,प्रशस्तीपत्रके इ. मिळाली असल्यास त्यांचा तपशिल.
१४. अर्ज अग्रेषित करणा-या उपसंचालकांचा शेरा / शिफारस
१५. सहसंचालकांची शिफारस ( फक्त मुख्यालयासाठी )

इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कार

वृक्षरोपण व पडीत जमीन विकासासंबंधी उत्कृष्ट कार्य करुन इतरांसमोर आदर्श निर्माण करणा-या संस्था तथा व्यक्तीना राष्ट्रीय पडीत जमीन विकास बोर्ड, पर्यावरण व वन मंत्रालय,नवी दिल्ली यांच्या वतीने इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. १९८६ पासून हे पुरस्कार देण्यात येतात. सन २००१ पर्यत महाराष्ट्रातील ३१ व्यक्ती/ संस्था यांना हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. पुरस्कारासाठी खालील प्रमाणे १० संवर्ग करण्यात आलेले आहेत.

१. व्यक्ती
२. पंचायत/ग्रामसभा/ग्रामपातळीवरील संस्था/ग्रामवन संरक्षण कमिटी/ग्राम पातळीवरील सहाकरी संस्था
३. स्वयंसेवी सस्था ( महिला मंडळे व तरुण मंडळासहित )
४. जनजागृतीसाठी झटणा-या महिला संस्था
५. शासकीय कर्मचारी ( व्यक्ती )
६. शैक्षणिक संस्था
७. शासकीय यंत्रणा ( जिल्हास्तरापर्यतच्या)
८. कॉर्पोरेटर सेक्टर ( खाजगी/सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या )
९. नगरपालिका/ महानगरपालिका/ लष्करी छावण्या
१०. राज्य शासनाच्या दर्जाच्या संस्था
   पुरस्काराची रक्कम - वरील प्रत्येक संवर्गासाठी  १,००,०००/- रुपयांचा एक पुरस्कार .याशिवाय पदक व प्रशस्तीपत्रक
   नामांकन प्राप्तीचा अंतिम दिनांक - सर्वसाधारणपणे दरवर्षी दिनांक ३१ मे पर्यत.

## ४) एकात्मिक पडीक जमिन विकास प्रकल्प